Vol 4 Issue 3 April 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-3 | April-2014
Available online at www.isrj.net

# "पंडीत नेहरु यांचे भारतीय परराष्ट्र धोरणाच्या संदर्भातील योगदान"

*अशोक नागप्पा उपासे*

प्रमुख, राज्यशास्त्र विभाग , कर्मवीर भाऊराव पाटील , महाविद्यालय,पंढरपूर.

**सारांश :-**

*परराष्ट्र धोरण म्हणजे काय?*

*व्याख्या–*

1) 1947 मध्ये नेहरु म्हणाले होते –"आम्ही कोणतेही धोरण स्विकारले तरी एखाद्या देशाची विदेशनीति म्हणजे त्या देशाला सर्वात लाभदायक काय ठरेल, हे शोधण्याची कला होय."

2) सार्वभौम राष्ट्रांनी आपले अल्पकालीन व दीर्घकालीन हित – कल्याण कशात आहे, हे जाणून घेवून, इतर राष्ट्रांशी परस्पर संबंध निर्माण करण्यासाठी जे धोरण स्वीकारलेले असते. ते धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

3) एखाद्या देशाने आपल्या देशासाठी कोणत्याही परराष्ट्रनीतीचा स्वीकार केलेला असला तरी, त्या मागचा मुख्य आधारण म्हणजे राष्ट्रीय कल्याण हाच असला पाहिजे. देशासाठी सर्वाधिक लाभदायक काय आहे? हे समजून घेवून ज्या धोरणाचे संचलन केले जाते, त्यास परराष्ट्र धोरण असे म्हणता येईल.

## प्रस्तावना :

परराष्ट्रधोरणात देशहिताचा विचार अत्यंत महत्वाचा ठरतो. राष्ट्रहित म्हणजे परराष्ट्र धोरणाचा आत्माच होय. परराष्ट्रीय धोरण ज्या तत्वानुसार निश्चित केले जाते, ते तत्व म्हणजे राष्ट्रहित होय. परराष्ट्रधोरणासंबंधीचा हा आशय लक्षात घेवूनच भारताने आपल्या परराष्ट्रधोरणाची निर्मिती करुन, त्याची यशस्वी अंमलबजावणी सुरु केली. असे आपणास ठामपणे म्हणता येईल. भारतीय परराष्ट्रधोरणाच्या निर्मिती प्रक्रियेशी सर्वप्रथम केंद्रस्थानी असणारे पंडीत नेहरु याचे भारताच्या परराष्ट्रधोरणातील योगदान एकमेवाद्वितीय असे आहे. अर्थात भारतासाठी नेहरुंनी स्वीकारलेल्या परराष्ट्रधोरणात राष्ट्रहिताबरोबरच संपूर्ण मानवजातीचे कल्याण हया आशयाचाही समावेश आहे. त्यांनी राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद या संबंधात वेळोवेळी मांडलेल्या विचारातून त्याची आपणास सहजपणे प्रचिती येते.

### अ) राष्ट्रवाद ते आंतरराष्ट्रवाद –

आपल्या "डिस्कव्हरी ऑफ इंडिया" या ग्रंथात नेहरु म्हणतात – राष्ट्रवाद हा प्रामुख्याने मागील काळातील यशप्राप्ती, परंपरा, अनुभव याबाबत असणाऱ्या सामुहिक स्मृतींचा पट होय. पुर्वी जितका नव्हता तितका आज राष्ट्रवाद बळकट झालेला आहे. जेव्हा जेव्हा संघर्षाची निर्मिती झाली. तेव्हा तेव्हा राष्ट्रवदाची निर्मिती होवून त्याने वर्चस्व गाजविले. लोकांनी त्यांच्या प्राचीन परंपरेत समाधान व सात्वंन मानून आपल्या सामर्थ्याचा व ताकदिचा शोध घेतला. सध्याच्या युगाची एक विलक्षण घडामोड कोणती असेल, तर आपल्या भुतकाळाचा व आपल्या राष्ट्राचा शोध घेणे ही होय."

नेहरुंची राष्ट्रवादाची विचारधारा वैशिष्टयपूर्ण आहे. कारण त्या पूर्वीचा राष्ट्रवाद हा धार्मिक भावनेने भारावलेला, पुनरुज्जीवनवादी, काहीसा संकुचित व आत्मकेंद्रित होता. नेहरुंनी त्यास धर्मनिरपेक्ष व्यक्तिमत्व, पुरोगामी आशय व समाजवादी तत्वज्ञानाची जोड दिली.

"कोणत्याही पारतंत्र्यातील लोकसमुदायात राष्ट्रीय स्वातंत्र्य ही प्राधान्याने असणारी अंतरिक इच्छा होय. भारताच्या बाबतीत तर तिला तिच्या व्यक्तिमत्वाची असलेली प्रखर जाणीव तिच्या प्रखर वारशामुळे अधिकच वास्तविक ठरली आहे असे दिसुन येते."

### 1)स्वयंनिर्णयावर विश्वास–

नेहरुंचा जगातील राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्कावर व त्या तत्त्वावर पूर्ण विश्वास होता. 10 फब्रुवारी 1927 रोजी ब्रुसेल्स येथे भरलेल्या साम्राज्याविरोधी आंतरराष्ट्रीय कॉग्रेसपुढे बोलताना ते म्हणाले होते की, "मला लक्षात आणून द्यावयास आवडेल की, भारताचा प्रश्न केवळ या देशाचा राष्ट्रीय प्रश्न नसून, तो इतर अनेक देशांना स्पर्श करणारा आहे. पारतंत्र्य ही परिस्थिती आम्हास अधिककाळ सहन करता

येणार नाही. कारण केवळ स्वातंत्र्य चांगले व गुलामगिरी वाईट आहे म्हणून नाही. तर आमचा व आमच्या देशाच्या जीवन मरणाचा तो प्रश्न आहे. आम्हा भारतीयांसाठी स्वातंत्र्य ही तातडीची गरज आहे. चिनी राष्ट्रवादाच्या उदात्त उदाहरणाने आमच्या आशा पल्लवित केल्या असून, शक्य तितक्या लवकर आम्ही त्यांच्या पावलावर पाऊल टाकू इच्छितो. आम्हास आमच्या देशासाठी पूर्ण स्वातंत्र्य हवे आहे. साहजिकच ते केवळ अंतर्गत नियंत्रणाचे नव्हे, तर आमच्या इच्छेनुसार आमच्या शेजारच्या व इतर भूमीशी संबंध ठेवण्याचे आणि ज्या अर्थी ही आंतरराष्ट्रीय कॉंग्रेस या दिशेने एकत्रित प्रयत्नांची उपलब्धता करुन देते, त्या अर्थी आम्ही तिचे स्वागत करतो.

म्हणजेच पं.नेहरुंनी एक राष्ट्रवादी नेता या नात्याने परकीय साम्राज्यशाहीचे जू फेकून देणाऱ्या व त्यासाठी संघर्ष करणाऱ्या राष्ट्रवाद्यांच्या बाजूनेच कौल दिला होता. त्यांनी इजिप्त, मोरोक्को, अल्जेरिया, इंडोनेशिया, कांगो इत्यादी देशांच्या स्वातंत्र्य लढयाचा पाठपुरावा केला. अरब, आफ्रिकी, आशियायी देशांच्या राष्ट्रवादास नेहमीच उचलून धरले. कारण त्यांचे असे मत होते की, पारतंतात्रील कोणत्याही देशाने राष्ट्रीय स्वातंत्र्याची इच्छा बाळगणे यात काहीही अयोग्य नाही.

### *2)राष्ट्रवादाच्या दोषासंबंधीची जाणीव–*

नेहरुंनी राष्ट्रवाद हया संकल्पनेचा वरीलप्रमाणे विधायक गुणात्मक विचार केलेला असला तरी, त्यांनी राष्ट्रवादाच्या दोषांकडे डोळेझाक केलेली नव्हती. त्याना याची जाणीव झालेली होती की, राष्ट्रवादाचे मानवी मनावर होणारे संकुचितपणा व दुराग्राहीपणाचे दुष्परिणाम मानवीहितासाठी घातक आहेत. एकांगी राष्ट्रवादाने भांडखोरवृत्तीचा देशभिमान जागवतो व त्यातून वेगळेपणाची प्रवृत्ती निर्माण होते. इतर देशांच्या बाबतीत व्देष, मत्सर, तिरस्कार निर्माण करतो. वंशश्रेष्ठत्त्वाला चेतावणी देवून साम्राजवादास प्रोत्त्साहन देतो. उग्रराष्ट्रवाद युध्दास कारणीभूत ठरतो आणि विशिष्ट मर्यादांच्या पलीकडे गेला तर तो आंतरराष्ट्रवादास मारक ठरतो. म्हणून नेहरुंनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत हा इतर देशांबरोबर शांततेचे, सलोरव्याचे व सहकार्याचे संबंध ठेवील असेच प्रयत्न केले आणि याला अनुसरुनच स्वातंत्र्योत्तर काळातील स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण राहील असेच पाहिले. याच वेळी त्यानी असा विश्वास दिला की भारत आंतरराष्ट्रीय संघटनेत सामील होवून तिच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी काही प्रमाणात सार्वभौमत्त्वाचा त्याग करण्यासही तयार होईल.

### *3)आंतरराष्ट्रवाद–*

पं.नेहरु हे सच्चे राष्ट्रवादी नेते होते. तरी परंतु त्यांच्या या राष्ट्रवादी विचारातून आंतरराष्ट्रवादाचे चैतन्य सतत ओसांडत असल्याचे दिसून येते. त्यांचा राष्ट्रवाद हा कधीच संकुचित व अलगतेच्या पायावर उभा नव्हता. त्यांच्या राष्ट्रवादात इतर राष्ट्राविषयीच्या द्वेषास जागा नव्हती. संपूर्ण सार्वजनिक जीवनात त्यांनी सातत्याने आंतरराष्ट्रवादाचा पुरस्कार केला. त्यांनी कॉंग्रेस संघटनेत इतर राष्ट्रांच्या प्रश्नासंबंधी व आंतरराष्ट्रीय संघटनांच्या कार्यासंबंधी रुची निर्माण केली. भारतीय स्वातंत्र्यासाठी चाललेला लढा हा संपूर्ण विश्वव्यापी संघर्षाचा एक भाग आहे. या आंतरराष्ट्रीय घडामोडीचा संदर्भ लक्षात घेवूनच त्यास गती देण्याचा प्रयत्न झाल्यास तो यशस्वी होईल. यावर त्यांचा विश्वास होता.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा जगभर स्वातंत्र्यासाठी चाललेल्या प्रयत्नांचा केवळ एक भाग आहे, हे नेहरुंचे मत तसेच दडपल्या जाणाऱ्या व पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रांचे भाष्यकार म्हणून त्यांनी स्वीकारलेली भूमिका म्हणजे नेहरु मानवजातीची जी एकता पाहत होते, त्यातून ती निर्माण झाली होती. उपनिषदे व भगवद्‌गीता यांच्या वाचनातून त्यांना मानवजातीच्या ऐक्याची आस निर्माण झाली होती. मानवी ऐकाचा संदेश देणारे रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, म.गांधी यांचा वैचारिक प्रभावही त्यास कारणीभूत होता. ते संकुचित राष्ट्रवादी कधीच नव्हते. "मानवी वंशाचे रक्षण करण्यासाठी संपूर्ण देशाने मरण पत्करले तरी चालेल" अशी त्यांची सुरुवातीपासूनची धारणा होती. 1933 मध्ये इंदिरा नेहरु यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "या अलिकडील वाढत्या संदेशवहन व्यवस्थेने व मानवजातीच्या एकतेसंबंधीची वाढत चाललेली जाणीव लक्षात घेता, आपला राष्ट्रवाद हा पुरोगामी आंतरराष्ट्रवादाशी विसंगत असता कामा नये. हे मान्य करण्यास मला जरासुध्दा अडचण नाही. जगातील इतर भागात काय घडत आहे, यापासून भारतास अलिप्त राहताच येणार नाही. म्हणून मी तुझ्याशी संपूर्णपणे सहमत आहे. आपण जगातील पुरोगामी शक्ती प्रवाहाबरोबर गेले पाहिजे." यावरुन असे म्हणता येईल की नेहरुंनी राष्ट्रवादाचे नाते अस्तित्त्व थोडेदेखील न नाकरता प्रचलित परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेवून राष्ट्रवादाचे नाते आंतरराष्ट्रवादाशी कसे जोडता येईल, हे त्यांनी अचूक ओळखले होते. म्हणूनच ते असे म्हणाले होते की, "मी जरी भारतीय राष्ट्रवादाचा समर्थक असलो, तरी इतरांच्या बरोबरीने व सामुहिक सुरक्षिततेच्या व्यवस्थेसाठी आम्ही भारतीय आनंदाने जागतिक व्यवस्थेशी सहकार्य करु व काही प्रमाणात राष्ट्रीय सार्वभौमत्त्वही सोडून देवू, परंतु हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा सर्व राष्ट्रे स्वातंत्र्य व शांतता या आधारावर एकमेकांशी संघटीत होतील. या विचारांचा आधार घेवूनच त्यांनी 10 फेब्रुवारी 1927 रोजी ब्रुसेल्स येथे भरलेल्या दडपलेल्या राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसला राष्ट्रीय कॉंग्रेसचा प्रतिनिधी म्हणून स्वतःला नामांकित केले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही त्यांनी आंतरराष्ट्रीय आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रवादी इच्छांचे भाष्यकार म्हणून भूमिका बजावली. पारतंत्र्यात असलेल्या देशांच्या संपूर्ण राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याचा व त्यांच्या या हक्कांचा त्यांनी जोरदार पुरस्कार केला. आशिया व आफ्रिकेतील देशांचे स्वातंत्र्य, ऐक्य व प्रगती याविषयी नेहरुंच्या असलेल्या विचारांचा प्रभाव, एण्क्रमा, सेकुतोरे, कमाल जुमलात व कासिम या नेत्यावर पडलेला दिसून येतो. तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन त्यांनी आर्थिक संदर्भानेही आंतरराष्ट्रवादाचे समर्थन केलेले दिसते. ते म्हणतात, "उत्पादन आंतरराष्ट्रीय, बाजारपेठ आंतरराष्ट्रीय, दळणवळण आंतरराष्ट्रीय स्वरुप धारण करीत असताना केवळ माणसांच्या कल्पना हया अर्थहीन ताठर स्वरुपाच्या विचारसरणीने नियंत्रित होत आहेत. पण कोणतेही राष्ट्र स्वतंत्र नाही. ती सर्वस्वी परावलंबी आहेत.

### *ब)पं.नेहरुंनी स्वीकारलेले भारताचे परराष्ट्रीय धोरण–*

पं.नेहरुच्या वरील विचारसरणीतून असे स्पष्ट होते की, जागतिक राजकारणातील भारताची व त्यांची स्वतःची भूमिका स्वातंत्र्यपूर्व

काळापासूनच घडत आलेली आहे. समृध्द ऐतिहासिक, सांस्कृतिक, वैचारिक वारसा आणि स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्त्व करणाऱ्या राष्ट्रीय कॉंग्रेसमधील पुढाऱ्यांचा दृष्टिकोण आणि गांधी व नेहरु यांचे तत्कालीन जागतिक व्यवस्थेचे आकलन यातूनच भारताच्या परराष्ट्रीय भूमिका विकसित झालेल्या आहेत.

भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या जडणघडणीत पं.नेहरुंचे योगदान फार मोठे आहे. भारताच्या पंतप्रधानपदावर साडेसतरा वर्षे राहिलेल्या नेहरुंनी परराष्ट्र विभाग स्वतःकडेच ठेवल्यामुळे आणि यातील संपूर्ण भूमिका त्यांचीच राहिल्यामुळे, ते भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार ठरले. स्वातंत्र्यानंतर भारतांसाठी नेहरुंनी ज्या परराष्ट्रधोरणाचा स्वीकार केला, त्या धोरणाच्या प्रेरणांचा विचार करता असे दिसून येते की–

1.जागतिक शांततेला पर्याय नाही.
2.स्वातंत्र्याचे मूल्य व स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार.
3.गौतमबुध्दांचा प्रज्ञा, शील व करुणेसंबंधीचा विचार.
4.वर्धमान महावीरांचा संदेश.
5.ज्ञानेश्वरांची –'वसुधैव –कुटुंबकम' ची संकल्पना.
6.न्या.रानडे यांचा उदारमतवाद.
7.लो.टिळकांचा खंबीर बाणा.
8.महर्षी अरविंदाचा अध्यात्मवाद.
9.टागोरांचा आंतरराष्ट्रवाद.
10.गांधीजींचा सहजीवन व अहिंसावाद.
11.धर्मनिरपेक्ष व गटनिरपेक्षवादी दृष्टिकोण.

वरील तत्त्वे नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाच्या प्रेरणा होत्या. या प्रेरणांच्या आधारे भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देण्यात पं.नेहरुंचे योगदान फारच महत्वाचे आहे. त्यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाचा पाया घातला आणि त्याच्या अंमलबजावणीतून भारताला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एक उच्च नैतिक स्थान मिळवून दिले त्यांच्या साडेसतरा वर्षाच्या कालखंडात भारताचे परराष्ट्रधोरण विकसित होत गेले. आज त्यांच्या निधनाला पाच दशके पूर्ण होत आहेत आणि महत्वाचे म्हणजे आज भारतीय राजकीय व आर्थिक व्यवस्था जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांशी वेगाने एकरुप होत असतानाच्या सध्याच्या परिस्थितीत देखील त्यांनीच निर्माण केलेली परराष्ट्र धोरणाची मूलभूत चौकट आपण सोडलेली नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्यगाभा तोच आहे. त्यानुसारच भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल आजही सुरु आहे. यातच नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाचे यश व भारतासाठी त्यांचे या क्षेत्रातील महत्वपूर्ण असे योगदान होय.

***क)पं.नेहरुप्रणीत भारतीय परराष्ट्र धोरणाची वैशिष्टये –***

***1)अलिप्ततेचे धोरण–***

अलिप्तता ही दुसऱ्या महायुध्दानंतरची संकल्पना असून, पं.नेहरु हे या संकल्पनेचे जनक आहेत. त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मध्यवर्ती सुत्र म्हणून या संकल्पनेचा पुरस्कार केला. "7 सप्टेंबर 1946 रोजी अलिप्तावादी परराष्ट्र धोरणाचे स्पष्टीकरण करताना नेहरु म्हणाले होते की, "कोणत्याही लष्करी गटात विशेषतः साम्यवादी व पाश्चात्य लष्करी गटात सामील न होणे म्हणजे अलिप्ततावाद होय. शक्यतो सत्तागटांच्या राजकारणापासून आम्ही अलिप्त राहू इच्छितो. त्यांच्या या विचारात अलिप्ततेची बीजे आढळतात. शांततामय सहजीवन हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा गाभा. त्याच्या पुर्ततेसाठीच भारताने अलिप्ततेचे धोरण स्वीकारले. जगातील दोन परस्परविरोधी महासत्तांच्या बलाढयशक्तींशी तोंड देण्यासाठी अलिप्ततावादाच्या तिसऱ्या शक्तीची नितांत आवश्यकता आहे.

पं.नेहरुंनी स्वीकारलेल्या अलिप्ततावादाच्या धोरणामागे तीन मूलभूत व व्यवहारिक कारणे होती. असे प्रा. वर्मा म्हणतात आणि त्या तीन कारणांचा पुढीलप्रमाणे उल्लेख करतात.

1.अलिप्ततावाद हे एक नैसर्गिक धोरण–नवोदित भारताने आपले लक्ष पूर्णपणे आर्थिक व सामाजिक पुनर्रचनेकडे केंद्रित केले पाहिजे. पण त्याऐवजी भारताने जर स्वतःला प्रतिस्पर्धी सत्तागटात गुंतवूण ठेवले तर आर्थिक व सामाजिक नियोजन व विकास याकडै दुर्लक्ष होईल.
2.ऐतिहासिक आधार–आपल्या ऐतिहासिक जीवनात भारताने शांततेचाच मार्ग स्वीकारलेला दिसतो. आक्रमणवादी व विस्तारवादी धोरणाचा भारताने कधीच पुरस्कार केलेला नाही.
3.नेहरुंच्या मते–अलिप्ततावाद हे धोरण सध्याच्या तणावाच्या परिस्थितीच्या व अणुयुध्दाच्या पार्श्वभूमीवर व्यावहारिक दृष्टया महत्वाचे ठरते. जागतिक राजकारणात शस्त्रधारी व एकमेकांच्या विरुध्द उभे असलेल्या कोणत्याही गटात सामील न होता भारताने व इतर नवोदित राष्ट्रांनी अलिप्ततावादाचा पुरस्कार केला, तर बरेचसे भौगोलिक क्षेत्र हे स्फोटक वातावरणापासून दूर राहू शकेल. परिणामी जागतिक शांतता स्थापन करण्यास मदत होईल आणि ही अलिप्त राष्ट्रे भांडखोर राष्ट्रांच्यामध्ये मध्यस्थांची भूमिका बजावू शकतील, अशी नेहरुंची धारणा होती.

अर्थात अलिप्तता म्हणजे कृतीहीन तटस्थ राष्ट्राची भूमिका नव्हे. हे ही ते मानत होते. जगाच्या घडामोडीत रस घेणारे व सक्रीय पाऊल उचलणारे असे गतिमान धोरण असून, ते अत्यंत उपयुक्त आहे. पण जेव्हा त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याला धोका पोहचण्याची शक्यता असेल व सुरक्षिततेला आव्हान मिळत असेल, तेव्हा अलिप्तवादाची मुलभूत चौकट कायम ठेवून त्यात गरजेनुसार बदल करण्याचीही नेहरुंची तयारी होती. ते म्हणतात भारताला युध्दाकडे नेणाऱ्या गटवादी राजकारणापासून दूर राहावयाचे आहे. हाच अलिप्ततावादाचा खरा अर्थ व

संदर्भही आहे.

***नेहरुंच्या अलिप्ततावादी धोरणाचे स्वरुप–***

1.लष्करी संघटना व लष्करी करार यापासून अलिप्त
2.शांततेच्या धोरणाचा पुरस्कार
3.स्वातंत्र्य व सार्वभौमत्त्व यावर आधारलेले धोरण
4.प्रसंगांनुरुप कारवाई करण्याचे स्वातंत्र्य असणारे धोरण
5.सहकार्य व सहजीवनाचे धोरण

वरील वैशिष्टयांच्या आधारे नेहरुंनी स्वीकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाची आंतरराष्ट्रीय स्तरावर 1955 च्या बांडूंग परिषदेत चर्चा झाली. 1956 मध्ये ब्रिओनी बेटावर पंडीत नेहरु, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष टिटो व इजिप्तचे नासेर यांचे अलिप्ततावादी धोरणावर एकमत झाले. त्यानुसार अलिप्ततेचे धोरण मान्य असणाऱ्या राष्ट्रांचे संमेलन बोलावण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे 1961 मध्ये युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे पहिली अलिप्ततावादी राष्ट्रांची परिषद भरविण्यात आली. तेव्हापासून अलिप्ततावाद ही एक महत्वपूर्ण चळवळ बनली. (अलिप्त राष्ट्रांच्या संस्थापकांपैकी एक पं.नेहरु सोडले तर इतर कोणत्याही संस्थापक नेत्याने आपल्या देशात लोकशाही स्वीकारलेली नव्हती.) नेहरु म्हणतात, "अलिप्तता म्हणजे शांततेचे क्षेत्र व संघर्ष प्रतिबंदाचे क्षेत्र विकसित करणे होय." अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे किंवा कोणत्याही गटाशी बांधिलकी नाही, तर प्रत्येक प्रश्नांवर त्याच्या गुणवत्तेनुसार स्वतंत्र निर्णय घेणारी आणि आंतरराष्ट्रीय राजकारण व त्यानुसार येणाऱ्या जबाबदाऱ्यामध्ये सक्रीय सहभागी होणारी विदेश नीती, म्हणजे अलिपततावादाचे धोरण होय.

अलिप्ततावादी धोरणाचा स्विकार करण्याचा उद्देश–दोन महायुध्दाकडे नेणाऱ्या आणि त्याहीपेक्षा अधिक विनाशकारी विध्वंसाकडे (तिसऱ्या महायुध्दाकडे) नेण्याची शक्यता निर्माण करणाऱ्या दोन परस्परविरोधी गटांच्या सत्ताराजकारणापासून दूर राहणे, हे आमचे धोरण असून, शांततेचे क्षेत्र अधिक विस्तृत करणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

***2)नेहरुंची पंचशील तत्वे–***

पं.नेहरु हे आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे नैतिकतेच्या दृष्टिकोणतून पाहत होते. शांततेच्या मार्गावर ते विश्वास ठेवणारे नेते होते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय राजकारणात सामंजस्य व सहिष्णूतेचे वातावरण, तडजोडीची वृत्ती व सहकार्याची जाणीव वाढीस लागावी म्हणून नेहरु प्रयत्नशील होते. याच वैचारिक पार्श्वभूमीवरुन त्यांनी मांडलेल्या पंचशील तत्त्वांचा आपण विचार केला पाहिजे. 1954 मध्ये भारत–चीन यांच्यात करार होवून तिबेटचा प्रश्न सोडविण्यात आला. यावेळी चीनचे पंतप्रधान चाउ–एन–लाय यांच्याशी मैत्रिपूर्ण संबंध वाढविण्यासाठी त्या कराराच्या आधारे नेहरुंनी पंचशील तत्त्वे जगापुढे मांडून शांततेचा जोरदार पुरस्कार केला.

***नेहरुंनी मांडलेली पंचशील तत्त्वे–***

1.सर्व राष्ट्रांनी एकमेकांचे सार्वभौमत्व मान्य करणे.
2.प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य व स्वायत्तता असणे.
3.कोणत्याही राष्ट्रांने इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभार हस्तक्षेप न करणे.
4.कोणत्याही राष्ट्रांने इतर राष्ट्रांवर आक्रमण न करता समानतेच्या भूमिकेवरुन परस्परांचा मान राखणे.
5.शांततामय सहजीवनाला अनुकूल अशी मनोवृत्ती व परिस्थिती विकसित करणे.

या तत्त्वांच्या आधारे जागतिक राजकारणात सुरक्षिततेची भावना व विश्वासाचे वातावरण निर्माण होईल असे त्यांना वाटे. त्यांची ही भूमिका भारतीय परराष्ट्र धोरणाला व जागतिक राजकारणाला "पंचशील तत्त्वाानाचे" योगदान देण्यास महत्वपूर्ण ठरली.

***3)जागतिक षांतता व सहकार्य–*** भारताच्या व जगातील अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या विकासाठी नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणात जागतिक शांतता व सहकार्य या तत्त्वांना प्राधान्य दिले.

***4)साम्राज्यवादे व वसाहतवादाला विरोध–*** भारताच्या परराष्ट्र धोरणाचे हे खास वैशिष्टय होय. वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध करण्याचे मुख्य कारण म्हणजे, साम्राज्यवादामुळे विश्वशांती धोक्यात येते. त्यातूनच संघर्ष, तणाव आणि शेवटी विनाशकारी युध्दांचा जन्म होतो. याची जाणीव नेहरुंना होती. म्हणूनच त्यांनी या तत्त्वाला आपल्या परराष्ट्र धोरणाचा एक भाग बनविला.

***5)वर्णविद्वेशाचा विरोध–***भारताने वर्णभेद, वंशभेद यासही विरोध केला आहे. दक्षिण आफ्रिका, दक्षिण अमेरिका, इंडोनेशिया व इतर राष्ट्रांमध्ये गोऱ्या लोकांनी वर्णविद्वेषाच्या आधारावर जो अत्याचार सुरु केला होता. तो मानवतावादी दृष्टिकोणातून अत्यंत घृणास्पद असल्यामुळे भारताने या वर्णविद्वेषक वृत्तीचा सर्वप्रथम निषेध केला. दक्षिण आफ्रिका, ऱ्होयडेशिया येथील वंशवादी राजवटीना विरोध केला. फिजी या पॅसिफिक महासागरातील छोटयाशा राज्यात वांशिक प्रश्न निर्माण झाला आणि भारतीय लोकांना अन्याय सहन करावा लागला तेव्हा यांचा निषेध म्हणून भारताने फिजीबरोबरचे राजनैतिक संबंध थांबविले.

***6)अलिप्ततावादी राष्ट्रांच्या संघटनेवर भर***– अलिप्ततावादी राष्ट्रांची संख्या आज 125 एवढी आहे. भारताने अलिप्ततावादाचा सर्वप्रथम पुरस्कार केला. पुढे आशिया व आफ्रिका खंडातील अनेक नवोदित राष्ट्रे अलिप्ततावादाकडे आकर्षित झाली. या गटाने 'संयुक्त राष्ट्रसंघाला' प्रभावित केले. अशाप्रकारे आफ्रिका–आशियायी तसेच आलिप्ततावादी देशांना संघटीत करण्यावर व त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना निर्माण करण्यावर भारत पहिल्यापासूनच पुढे असून, नेहरुप्रणीत भारताच्या परराष्ट्र धोरणाचे हे एक प्रमुख वैशिष्टयच बनले आहे.

***7)दोन्ही सत्ताबरोबर मैत्रिचे संबंध***–विचारप्रणालीने विभाजित झालेल्या जगातील दोन्ही सत्तागटापासून भारताला अलिप्त ठेवून, दोघांशीही सन्मान्य संबंध प्रस्थापित करुन नेहरुनी सत्तेच्या स्पर्धेपासून भारताला दूर राखण्यात यश मिळविले. तसेच नव्याने स्वतंत्र झालेल्या अनेक राष्ट्रांना स्वयनिर्णयाच्या हक्काचा, विकासाचा मार्ग दाखविला. नेहरुंचे हे कार्य भारतासाठी व त्याचप्रमाणे नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांसाठी अत्यंत मौलिक ठरवले आहे.

***8)संयुक्त राष्ट्रसंघटनेवर विश्वास***–पं.नेहरुंचा संयुक्त राष्ट्रसंघाच्या ध्येयधोरणावर व कार्यावर विश्वास होता. म्हणूनच त्यांनी असे मानले की जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी राष्ट्रसंघाच्या कार्यात सहकार्य देणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक महत्वाचे योगदान ठरले.

***9)भारताची दक्षिण आशियायी क्षेत्रातील भूमिका***–दक्षिण आशियातील भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश, मालदिव, श्रीलंका या सात देशांच्या धोरणात भारताचे परराष्ट्र धोरण महत्त्वाचे आहे. कारण यासर्व प्रदेशातील संघर्ष सोडविण्याचा प्रयत्न भारताने केलेला आहे. वरील सात राष्ट्रांची सार्क संघटना 1986 मध्ये स्थापन झाली. यामागची मुख्य भूमिका म्हणजे नेहरुंच्या परराष्ट्रीय धोरणानुसार दक्षिण आशियातील या सातही देशांत सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय संबंध वाढून या सर्व राष्ट्रांचा विकास व्हावा असे भारतास वाटते. असे वाटणे हा देखील नेहरुंनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणाला दिलेली गुणात्मक देणगी आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

स्वतंत्र भारताच्या पंतप्रधानपदाची व परराष्ट्र मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर नेहरुंनी तत्कालीन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करुन, आपला ऐतिहासिक वारसा समोर ठेवून, भारतासाठी ज्या परराष्ट्र धोरणाचा स्वीकार करुन त्याची जी अंमलबजावणी केली. त्यामुळे भारत आणि पं.नेहरु यांना जागतिक सन्मान प्राप्त झाला. त्यामुळे भारताचा स्वाभिमान, उज्वल भवितव्य व स्वतंत्र वाटचाल करण्याचा निर्धार यांची मुहूर्तमेढ उभारण्याचे संपूर्ण श्रेय नेहरुंचेच आहे.

पं.नेहरुंच्या परराष्ट्र धोरणविषयक भूमिकेचा विचार करताना असे जाणवते की, तत्कालीन जागतिक परिस्थितीत नुकतेच विध्वंसक युध्द संपले होते. अण्वस्त्रांनी आपली संहारकता दाखवून दिली होती. जग विचारसरणीच्या आधारे दोन गटात विभागले होते. प्रत्येक गट स्वतःचे सामर्थ्य वाढविण्यासाठी प्रयत्नशील होता. त्यामुळे दोन महासत्ताच्या गटात वर्चस्वासाठी अक्षरशः रस्सीखेच सुरु झाली होती. या शीत युध्दाच्या जागतिक वातावरणात प्रत्यक्ष युध्दाला केव्हा सुरुवात होईल हे सांगता येणारे नव्हते. अशा परिस्थितीत नेहरुनी भारतीय परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून अलिप्ततावाद व त्या अनुषंगाने शांतता व सहजीवन या तत्त्वांचा जो पुरस्कार केला, त्यामुळे भारताच्या विकास कार्यात दोन्ही गटांचे प्रचंड समर्थन व योगदान लाभले. देशाची दुर्बल स्थिती व मर्यादित क्षमता लक्षात घेवून शांततावाद, सहअस्तित्ववाद आणि वाटाघाटीवर भर देणारा राजनय यांचा आधार घेवून भारताला जागतिक प्रसिध्दी व संरक्षण ही मिळवून दिले.

भारताच्या स्वातंत्र्याचा संकोच होईल असे कोणतेही धोरण स्वीकारणे नेहरुंच्याकडून शक्य नव्हते. भारताप्रमाणेच आफ्रिकी, आशियायी व लॅटिन अमेरिकन राज्यांची स्थिती तत्कालीन परिस्थितीत असल्यामुळे स्वातंत्र्य चळवळीतून उदयास आलेल्या नासेर, डॉ.सुकार्णो क्वामे एण्क्रूमा, टिटो इ.नेत्यांनी स्वंयनिर्णयाच्या अधिकाराचा पुरस्कार करणाऱ्या नेहरुंच्या अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार केला. या चळवळीच्या माध्यमातून कोणाच्याही हातचे बाहुले न बनता सदस्य देशांना विकसित होण्यास संधी मिळाली. नवोदित राष्ट्रे सत्तासंघर्षाच्या राजकारणात गुंतून न पडल्यामुहे जी शांतता व स्थिरता त्यांना लाभली, त्याचा उपयोग नियोजनबध्द पध्दतीने देशाच्या विकासासाठी करता आला. नेहरुंच्या पुढाकाराने 1950 साली दिल्ली येथे इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात आफ्रो–आशियायी राष्ट्रांची परिषद बोलवण्याची घटना असेल किंवा 1955 ची याच देशांच्या राष्ट्रवादाला परिघोषित करणारी बांडुंगची परिषद असेल किंवा 1956 चे सुवेझ प्रकरण असेल किंवा कांगो व कोरियाची समस्या, वंशवादी दक्षिण आफ्रिकेचा धिक्कार असो, की क्युबा प्रकरण असो, की 1962 ची यशस्वी मध्यस्थी असेल या सर्व भूमिकांचा अविष्कार अलिप्ततेच्या मंचावर स्वतंत्रपणे होवू शकला. या चळवळीच्या संदर्भातील ही घटना म्हणजे नेहरुंचे त्यासाठी लाभलेले महत्त्वपूर्ण योगदान होय. त्यांनी शांततेचे क्षेत्र विस्तारित करण्याचा जो प्रयत्न केला तो इतर देशांच्या समर्थनास व प्रशंसेस पात्र ठरला. याबाबत आपले मत मांडताना मायकेल ब्रेशर म्हणतात. "नेहरु हे बाहय जगात भारताच्या धोरणाचे तत्वज्ञ, शिल्पकार, अभियंता आणि प्रवक्ते होते." तर जागतिक पातळीवर याचे असेही कौतुक करण्यात आले की, "पंडीत नेहरुंचे हे प्रयत्न म्हणजे भविष्यातील युध्द टाळण्याचे धोरण होय." पंडीत नेहरुंच्या या मानवतावादी कार्यामुळेच सपूर्ण जग तिसऱ्या महायुध्दासारख्या महाभयंकर संकटापासून वाचले.

वरील प्रमाणे नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाबाबत गुणगौरव करण्यात आलेला असला, तरी स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या तीन दशकातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार करता, नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर अशी टिका केली जाते की, त्यांनी राष्ट्रहिताची हेळसांड केली, काश्मिर प्रश्न म्हणजे त्यांच्याच धोरणाचा परिणाम, त्यांनी परराष्ट्र धोरणाचे गाभातत्त्व म्हणून अहिंसा, शांतता व सहजीवन या मुल्यांचा जो स्वीकार केला होता. त्या मुल्यावरच अनेक आरोप झाले. 1954 साली चीन बरोबर केलेला पंचशील करार, अलिप्त राहण्याचा निर्धार, लष्करी सज्जतेकडे केलेले दुर्लक्ष, देशांतर्गत प्रश्नांऐवजी आंतरराष्ट्रीय प्रश्नांना महत्त्व देणे इत्यादी आरोप करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने डाव्या, उजव्या व विशेष करुन कॉंग्रेसमधील उदारमतवाद्यांचा समावेश आहे.

नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर वरीलप्रमाणे करण्यात आलेले आरोप काही प्रमाणात मान्य करुनही, पुढे आपण असे म्हणू शकतो की, त्यानी स्वीकारलेले परराष्ट्र धोरण आज देखील तेवढेच उपयुक्त आहे. कारण आज रशिया व अमेरिका असे दोन गट नसले तरी देखील अलिप्ततावादाची आवश्यकता संपलेली नाही. उलट ती अधिकच वाढलेली आहे. आज विकसनशील राष्ट्रांच्या दुर्बल परिस्थिचा फायदा मोठी राष्ट्रे घेत आहेत. प्रत्यक्ष आक्रमण न करताही मदतीच्या नावाखाली आर्थिक साम्राज्यवाद निर्माण करीत आहेत. अशा परिस्थितीत अलिप्ततावादी राष्ट्रे संघटीत होवून त्यांनी आपले सामर्थ्य वाढविले तरच या मोठया राष्ट्रांना शरण न जाता आपले स्वातंत्र्य सुरक्षित ठेवून ते

आपला स्वाभिमान जपू शकतील.

आज आपण अशा जागतिक परिस्थितीत आहोत की, ज्यामध्ये प्रामुख्याने दहशतवाद, मानवी हक्कांची पायमल्ली, वंशवादी उद्रेक, शस्त्रास्पर्धा, आर्थिक व आण्विकदृष्टया सामर्थ्यशाली राष्ट्रांची दादागीरी व त्यांची जागतिक नेतृत्त्व करण्याची महत्त्वकांक्षा यासारख्या अनेक प्रश्नांच्या संदर्भात भारताला काही प्रमाणात नव्याने भुमिका घ्यावी लागली तरी, त्याचा मुलभूत आधार हा नेहरुंनी स्वीकारलेले परराष्ट्र धोरण हाच असेल. केवळ त्याच मार्गाने आपण जागतिक राजकारणात यशस्वी होऊ असे वाटते. कारण याला दुसरा पर्याय नाही. (केंद्रात कॉग्रेसशिवाय इतर राजकीय पक्षांचे सरकार सत्तेवर आले तरी, त्यांनी देखील भारताच्या परराष्ट्र धोरणात दुसरा पर्याय तर स्वीकारला नाहीच, पण त्यात बदल देखील केला नाही.) म्हणून नेहरुंनी स्वीकारलेल्या परराष्ट्र धोरणाची उपयुक्तता आजही नाकरता येणार नाही. बदलत्या परिस्थितीनुसार नेहरुप्रणीत परराष्ट्र धोरणाचा गाभा तसाच ठेवून गरजेनुसार त्यात बदल करुण भारताच्या परराष्ट्र धोरणांची पुर्नमांडणी करावी लागली तरी त्याबाबत ऐवढेच म्हणता येईल की परराष्ट्र धोरण हे परिस्थितीचे अपत्य असते.

*संदर्भ सूची–*

1.Baljit sing: Indian Foreign Policy (Ais, 1975)
2.Docter Adi.H; International Relation.
3.Jangam R.T. : An Outline of International Politics.
4.Nanda B.R. (Ed.) –Indian foreign policy: The Nehru Years. (Vikas Delih, 1976)
5. Shrivastava & Joshi : Therory of International Relationship.
6.डॉ.वासंती रासम, डॉ.करिअप्पा खापरे : आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण.
7.डॉ.चंद्रशेखर दिवाण :भारताची विदेशनीती
8.डॉ.वसंत रायपूरकर : आंतरराष्ट्रीय संबंध
9.गर्दे.दि.का. : आधुनिक भारतीय राज्यविचार
10.डॉ.वि.मा.बाचल : भारतीय राजकीय विचारवंत.
11.नवभारत : डिसेंबर 2010.
12.साधनाः 26 फेब्रुवारी 2011.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net